**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ चा उलटतपास**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -सुधा राजु शंभरकर

**उलटतपास शपथेवर प्रतिवादी क्र.०१ तर्फे श्री एस.एम.पिंपळकर यांच्या मार्फत सुरू.**

**१०.** मी अशिक्षित आहे. मला माझी जन्मतारिख किती आहे ते सांगता येत नाही. आजरोजी माझे वय ५५ किंवा ५६ असेल. मला वाचता लिहीता येत नाही. मी पाठीमागे जे शपथपत्र दिले होते ते मी स्वत: वाचले नव्हते ते माझ्या पोराने वाचुन दाखविले होते. किसन सोनारकर हे माझे आजोबा होते व त्यांना गंगाराम सोनारकर म्हणजेच माझे वडील हे वारस होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील गंगाराम यांना सत्यभामा नावाची बहीण आहे व ती मयत झालेली आहे. हे मला माहित नाही की, सत्यभामा हिला तीन मुले व तीन मुली हे वारस आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, सत्यभामा ही शडेश्वर येथे राहायची. हे मला माहित नाही की, सत्यभामा व गंगाराम यांच्यामध्ये किती वयाचा फरक आहे. सत्यभामा ही माझी आत्या होती. हे मला माहित नाही की, माझे वडील गंगाराम हे लहाण असतांना माझे आजोबा किसन हे मयत झाले होते किंवा कसे.

**११.** हे मला माहित नाही की, माझे वडील गंगाराम हे १ ते २ वर्षाचे असतांना माझे आजोबा किसन हे मयत झाले होते किंवा कसे. हे मला माहित आहे की, माझे वडील गंगाराम हे शडेश्वर येथेच राहायचे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई गिरिजाबाई ही शडेश्वर याच गावची रहीवासी आहे. हे मला माहित नाही की, लहाणपणापासुन गंगाराम हे शडेश्वरलाच राहायचे व त्यांचे लग्नसुध्दा शडेश्वरलाच झाले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही वादी व प्रतिवादी यांचा जन्म शडेश्वर येथे झालेला आहे. प्रतिवादी क्र.२ प्रेमसागर हा आमच्या भावंडापैकी मोठा आहे. मला माझा भाऊ प्रेमसागर हा माझ्यापेक्षा किती वर्षांनी मोठा आहे हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, माझे वडील प्रेमसागर याच्या जन्माच्या किती वर्षापासुन आधी शडेश्वर येथे राहायचे. हे मला माहित नाही की, गंगाराम यांचे पालनपोषण सत्यभामाबाईने केले किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न शडेश्वर येथून झाले. साक्षीदार स्वत:हून सांगते की, मी माझ्या लग्नाच्या वेळी शडेश्वर येथे राहायची. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील गंगाराम हे रोजमजुरी करून उदर्निवाह करायचे. हे मला माहित नाही

की, माझे वडील  आनदेव या व्यक्तीकडे नोकरी करायचे किंवा कसे.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, आमचे वादी व प्रतिवादी यांचे शिक्षण शडेश्वर येथे झाले. हे म्हणणे खरे आहे की, गंगाराम हे शडेश्वर येथे राहत असल्यामुळे कोलार येथिल जमिन पडिक होती. कोलार व शडेश्वर या गावामधील अंतर ४० किमी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील गंगाराम यांनी कोलार येथिल जमिन उध्दव डोमाजी सोनारखन यांना विकली होती. हे मला माहित आहे की, मी अभिलेखावर माझ्या वडीलांनी कोलार येथील जमिन उध्दव डोमाजी सोनारखन यांना विकली याबाबतचे विक्रीपत्र मी दाव्यासोबत लावले आहे. उध्दव सोनारखन हे माझे नातेवाईक आहे. साक्षीदार स्वत:हून सांगते की, मी त्यांना ओळखत नाही. हे मला माहित नाही की, उध्दव सोनारखन हे मयत झाले आहे किंवा कसे.

**१३.** हे मला माहित नाही की, कोलार येथील जमिन उध्दव सोनारखन यांचे वारस वाहत आहेत किंवा कसे. माझे कोलार या गावी जाणे येणे नाही. कोलार येथील जमिन वडीलोपार्जित असल्याबाबत मला माहिती आहे. हे मला माहित नाही की, कोलार येथील जमिन उध्दव सोनारखन यांना कोणत्या वर्षी विकली.

**१४.** हे मला माहित नाही की, म्हसाळा येथील वादमिळकत माझ्या वडीलांनी केव्हा खरेदी केली. हे म्हणणे खरे आहे की, म्हसाळा येथील वादमिळकत ही माझ्या वडीलांनी खरेदी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, म्हसाळा येथील वादमिळकत खरेदी केल्यानंतर माझ्या वडीलांचे एकट्याचे नाव ७/१२ च्या उता-यावर होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचे एकट्याचे नाव सदर वादमिळकत म्हसाळा येथील जमिनिच्या उता-यावर असल्याने ते एकटे मालक होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर म्हसाळा येथील वादमिळकत माझ्या वडीलांनी एकट्याने खरेदी केली असल्याने खरेदीखताप्रमाणे ते एकटे मालक होते.

**१५.** हे मला माहित नाही की, दाव्यातील म्हसाळा येथील जमिन ही माझ्या वडीलांनी गंगाधर आनदेव यांच्याकडुन खरेदी केली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी गंगाधन आनदेव यांना स्वत: कष्ट करून सदर जमिनीचा मोबदला दिला होता. साक्षीदार स्वत:हून सांगते की, सदर जमिनीचा मोबदला वडिलोपार्जित मिळकतीच्या उत्पन्नातुन दिला होता. कोलार येथील वादमिळकत वडिलोपार्जित असल्याबाबत अभिलेखावर दस्तऐवज लावलेले नाही. सदर जमिनीचे मुळ मालक पंजोबा नंतर किसन त्यानंतर वडील गंगाराम असे कोलार येथील जमिनिचे मालक असल्याबाबद कागदोपत्री

पुरावा मी अभिलेखावर लावलेला नाही. कोलार येथील वादमिळकत ही वडिलोपार्जित असल्याबाबत दस्तऐवज अभिलेखावर लावलेला आहे किंवा कसे हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, सदर कोलार येथील जमिन वडिलोपार्जित नसल्याने त्याबाबाचा कागदोपत्री पुरावा मी अभिलेखावर लावलेला नाही. मी सदर दस्तऐवजाबाबत कोलार येथे शोध घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोलार येथील वादमिळकत ही वडिलोपार्जित आहे किंवा कसे याबाबत दस्तऐवजाचा शोध न घेतल्यामुळे सदर जमिन माझी वडिलोपार्जित जमिन नाही.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, कोलार येथील जमिन वडिलोपार्जित जमिन नाही. कोलार येथील जमिनीतुन किती उत्पन्न झाले त्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोलार येथील जमिनीतुन माझ्या वडीलांना किती उत्पन्न होत होते याबाबत दस्तऐवज मी अभिलेखावर लावलेला नाही. तसेच त्यातुन किती उत्पन्न व्हायचे हे मला माहिती नाही. माझ्या वडीलांनी म्हसाळा येथील वादमिळकत विकत घेतल्याने त्यांना सदर जमिनिची विल्हेवाट लावण्याचा अधिकार होता. साक्षीदार स्वत:हून सांगते की, सदर जमिन वडिलोपार्जित उत्पन्नातुन विकत घेतलेली आहे. म्हसाळा येथील जमिन माझ्या वडीलांनी वडिलोपार्जित जमिनिच्या उत्पन्नातुन विकत घेतली हे दर्शविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, गंगाधर आनदेव यांना माझ्या वडीलांनी रक्कम कुठून दिली याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांना म्हसाळा येथील जमिनीची विल्हेवाट लावण्याचा अधिकार असल्याने त्यांनी सदर जमिनीबाबते मृत्युपत्र करून दिले होते. हे मला माहित नाही की, माझा भाऊ विनोद याने सदर मृत्यूपत्रावरून जमिनीचा फेरफार होण्यासाठी महसून विभागाकडे अर्ज केला होता किंवा कसे. हे मला माहित नाही की, दि.०४/०१/२०१८ रोजी माझा भाऊ विनोद याने सदर मृत्यूपत्रावरून जमिनीचा फेरफार होण्यासाठी महसून विभागाकडे अर्ज केला होता किंवा कसे. हे मला माहित नाही की, माझे वडील मयत झाल्यानंतर विनोद याने फेरफार करण्यासाठी तीन महिन्यानंतर अर्ज दिला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीसपत्रावरून फेरफार करण्यासाठी पटवारी यांनी मला नोटीस दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस मला सन २०१८ मध्ये आले होते. हे म्हणणे खरे आहे की, पटवारी यांनी माझा भाऊ विनोद व प्रेमसागर यांचे नाव वादमिळकतीवर न चढविता गंगाराम यांच्या सर्व वारसांचे नाव

वादमिळकतीच्या रेकॉर्डवर चढविले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब ही सन २०१९ मधील आहे. हे म्हणणे खरे आहे की, गंगाराम यांच्या सर्व वारसांची नावे म्हसाळा येथील वादमिळकतीवर चढविल्यामुळे विनोद (प्रतिवादी क्र.१) यांनी एस.डी.ओ. यांच्याकडे अपिल केले होते. साक्षीदार स्वत:हून सांगते की, त्याबाबत मला माहित नाही. हे मला माहित नाही की, नि.क्र.३२ वरिल आदेश हा सदर अपिलामधीच आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, एस.डी.ओ. यांच्याकडे प्रतिवादी यांनी जे अपिल केले होते त्याबाबत मला नोटीस आले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांनी सन २०२० मध्ये सदर अपिल केली होती.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिलामध्ये माझे वकीलसाहेब श्री. मने हेच होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिलामध्ये निकाल लागला व म्हसाळा येथील वादमिळकतीवरून आमची नावे वगळण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी म्हसाळा येथील वादमिळकतीच्या ७/१२ च्या उता-यावर प्रतिवादी विनोद व प्रेमसागर यांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३२ वरिल आदेश हा प्रतिवादी यांच्या बाजुने झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी जे मृत्यूपत्र करून दिले होते त्या मृत्यूपत्राच्या अनुषंगाने नि.क्र.३२ वरिल आदेश झाला होता.

**१९.** नि.क्र.३२ वरिल आदेशाच्या विरूध्द मी अपिल केलेली आहे. हे मला माहिती नाही की, नि.क्र.३२ वरिल आदेशाविरूध्द जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल करावी लागते किंवा कसे.

**मध्यान्हाची वेळ सुरू झाल्यामुळे उलटतपास तहकूब.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०७.०८.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह दि.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड

**मध्यान्हानंतर उलटतपास प्रतिवादी क्र.०१ तर्फे श्री एस.एम.पिंपळकर यांच्या मार्फत शपथेवर पुढे सुरू.**

**२०.** जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयामध्ये नि.क्र.३२ विरूध्द केलेल्या अपिलाबाबत दस्तऐवज मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नि.क्र.३२ विरूध्द कोणतीच अपिल दाखल न केल्यामुळे मी त्याबाबत दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेला नाही. याबद्दल मला काही माहिती नाही की, माझ्या वडिलांनी कोलार येथील जमिन उध्दव सोनारखन यांना विकली किंवा कसे. मला हे माहित नाही की, कोलार येथील जमिन ही वादमिळकत म्हणून सदर दाव्यामध्ये जोडुन त्यामध्ये हिस्सा मागितला आहे किंवा कसे. हे मला माहित नाही की, मी सदर दाव्यामध्ये कोलार येथील घरमिळकतीबाबत हिस्सा मागितला आहे किंवा कसे. हे मला माहिती आहे की, मी सदर दाव्यामध्ये म्हसाळा येथील वाद शेतमिळकतीबाबत हिस्सा मागितलेला आहे.

**२१.** सत्यभामा हिचे गुणाजीसोबत लग्ण झाले होते किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सत्यभामा यांच्याकडे व त्यांच्या मुलांकडे जाणे येणे आहे. हे मला माहित नाही की, माझ्या वडीलांनी सोनारखन यांच्या हक्कामध्ये करून दिलेले शेतमिळकतीचे विक्रीपत्र सदर दाव्यामध्ये आव्हानित केले आहे किंवा कसे. माझ्या वडीलांना कुठली बिमारी होती हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील बिमार असल्याबाबत मी पुरावा लावलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील बिमार नसल्यामुळे मी पुरावा लावलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न माझ्या वडीलांनी करून दिले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नात माझ्या वडीलांनी दागदागिणे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी मला लग्णात दागदागिणे दिल्यामुळे माझ्या वडीलांनी वादशेतमिळकत ही माझ्या भावांच्या नावांवर मृत्यूपत्रान्वये हस्तांतरित केली. हे मला माहित नाही की, कोलार येथील जमिन माझ्या वडीलांच्या एकट्याच्या मालकीची होती किंवा कसे. हे मला माहित नाही की, माझे वडील कोलार येथील जमिनीचे एकटेच मालक असल्यामुळे त्यांनी सदर जमिन उध्दव सोनारखन यांना विक्री करून दिली किंवा कसे.

**२२.** हे म्हणणे खरे नाही की, म्हसाळा येथील जमिन माझ्या वडीलांची एकट्याची जमिन असल्यामुळे त्यामध्ये हिस्सा मागण्याचा मला अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे माझा भाऊ प्रेमसागर याच्यासोबत चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी विनोद यांच्यासोबत माझे बोलणेचालणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी

प्रेमसागर यांनीच हा दावा दाखल करायला लावला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी खरे मृत्युपत्र करून दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दिले व खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र.१ तर्फे उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.०२ गैरहजर, त्यांचे वकील गैरहजर सबब उलटतपास नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०७.०८.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह दि.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड